ePaper
ताानाजी सावंत यांनी फेसबुकचा डीपी आणि कव्हर फोटो बदलला!

‖ वर्ष - 8 । अंक -158 ‖ UDYAM-MH-26-0158827 ‖



महाईन्यूज ™
लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आतील पानांत

- पाटीदार पंचांच्या निर्णयावर वैतागला
- केन विल्यमसनने घडवला इतिहास
- १९७१ चा ऐतिहासिक फोटो हटवला!
- शहडोलमध्ये पारा 1 ; अयोध्येत 2.5 !

www.mahaenews.com | मंगळवार, दिनांक 17 डिसेंबर 2024 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## महायुती सरकारची वचनपूर्ती

# लाडक्या बहिणींसाठी 1400 कोटींची तरतूद!

### ❯❯ कॅबिनेट मंत्री उदय सामंत यांनी मांडल्या पुरवणी मागण्या

**। मुंबई । महाईन्यूज**

**महायुती सरकारने सोमवारी राज्य विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात ३५,७८८ कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या मांडल्या. महायुती सरकारच्या पहिल्याच अधिवेशनात मांडण्यात आलेल्या या पुरवणी मागण्यांमध्ये लाडकी बहीण योजनेसह राज्य सरकारच्या चालू असलेल्या योजनांसाठी तरतूद करण्यात आली आहे. शिंदेसेनेचे मंत्री उदय सामंत यांनी विधानसभेत या पुरवणी मागण्या मांडल्या.**





'लाडकी बहीण'साठी १४०० कोटी रुपये देण्यात आले आहेत. महिला व बाल विकास विभागासाठी २,१५५ कोटी रुपये तरतूद करण्यात आली असून, यात लाडकी बहीण योजनेसाठी १,४०० कोटी रुपये राखून ठेवले आहेत. लाडकी बहीण योजनेत २.३४ कोटी महिला लाभार्थ्यांना जुलै ते नोव्हेंबर या कालावधीपर्यंत ७,५०० रुपये आधीच देण्यात आले आहेत.

महायुतीने ही मदत मासिक १५०० रुपयांवरून मासिक मदत २१०० रुपये करण्याचे आश्वासन दिले आहे. महिलांना लाडकी बहीण योजनेचे डिसेंबर महिन्याचे पैसे मिळालेले नाहीत, पुरवणी मागण्यांत तरतूद केलेली ही रक्कम डिसेंबरचे पैसे देण्यासाठी वापरली जाईल.

### दूध अनुदान योजनेसाठी 758 कोटी :

पंतप्रधान मोदी आवास घरकुल योजनेसाठी १२५० कोटी रुपये, पात्र सहकारी साखर कारखान्यांना मार्जिन मनी देण्यासाठी १२०४ कोटी रुपये, राज्यातील महाविद्यालये, लघु, मध्यम आणि मोठ्या उद्योगांना प्रोत्साहन देण्यासाठी १ हजार कोटी रुपये आणि दूध अनुदान योजनेसाठी ७५८ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

## पुणे-पिंपरी-चिंचवडमध्ये थंडीचा जोर कायम!

### ❯❯ राज्यातही थंडी वाढली : नगरमध्ये सर्वात कमी 5.5 अंश सेल्सिअस तापमान

**। पुणे ।**
**प्रतिनिधी : महाईन्यूज**

**पुणे-पिंपरी-चिंचवडकरांना आता थंडीचा कडाका सहन करावा लागत असून, पुण्यात सोमवारी (ता. १६) राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीमध्ये (एनडीए) ६.१ अंश सेल्सिअस तर शिवाजीनगरमध्ये ७.८ अंश सेल्सिअस तापमान नोंदविण्यात आले.**



ढगाळ वातावरणामुळे गायब झालेली थंडी पुन्हा वाढण्यास सुरुवात झाली आहे. हवामानशास्त्र विभागाकडून पुढील काही दिवस थंडीचा जोर कायम राहण्याचा अंदाज वर्तविण्यात आला आहे. पुण्याप्रमाणेच राज्यात थंडी वाढली असून, सर्वात कमी तापमानाची नोंद ही अहिल्यानगरमध्ये झाली आहे. नगरमध्ये सर्वात कमी ५.५ अंश सेल्सिअस तापमान नोंदवले गेले. यंदाच्या हंगामातील ही सर्वात कमी तापमानाची नोंद झाली. पुण्यात मागील काही दिवसांमध्ये हवामानात सातत्याने चढउतार झाले आहेत. काही दिवस थंडी पडल्यानंतर पुन्हा ती गायब झाली. आता पुन्हा तापमानाचा पारा घसरला आहे. राज्यामध्ये सातत्याने दिवसा आणि रात्रीच्या तापमानात घट होत आहे. त्यामुळे पुण्यातील एनडीए, शिवाजीनगर, शिरूर, माळीण, दौंड, बारामती या ठिकाणी किमान तापमान एक आकडी नोंदवले गेले.

तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता... पुण्यामध्ये सहा ते सात अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. येत्या १८ डिसेंबरपासून राज्यात ढगाळ वातावरण राहणार आहे. तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. पुण्यात हवामान विभागानुसार सोमवारी शिरूर ६.२ अंश सेल्सिअस, माळीण ७.३ अंश सेल्सिअस, दौंड ७.३ अंश सेल्सिअस, बारामती ७.३ अंश सेल्सिअस, तळेगाव ८.३ अंश सेल्सिअस, राजगुरुनगर ८.५ अंश सेल्सिअस, इंदापूर ९.७ अंश सेल्सिअस तापमान नोंदवले गेले.

### किमान तापमान राज्य

**पुणे : ९.०**
**नगर : ६.४**
**जळगाव : ७.९**
**महाबळेश्वर : १२.५**
**नाशिक : १०.६**
**सातारा : १२.१**
**सोलापूर : १४.०**
**मुंबई : २२.४**
**छ. संभाजीनगर : ८.८**
**परभणी : ८.६**
**अकोला : ९.६**
**गोंदिया : ७.२**
**वर्धा : ७.४**

# छगन भुजबळ यांना उपमुख्यमंत्री करा!

## ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी आक्रमक भूमिका मांडली

। पुणे ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राज्यातील महायुती सरकारचा काल नागपूर येथे मंत्रिमंडळ विस्ताराचा सोहळा पार पडला. या मंत्रिमंडळ विस्तारामध्ये अनेक नव्या चेहऱ्याना संधी देण्यात आली. मात्र अजित पवार गटाचे ज्येष्ठ नेते आणि आमदार छगन भुजबळ आणि भाजपचे आमदार गोपीचंद पडळकर यांना मंत्रिमंडळात स्थान देण्यात आले नाही. यामुळे राज्यातील ओबीसी समाज नाराज झाल्याचे पाहण्यास मिळत आहे.**



नेते लक्ष्मण हाके यांनी आक्रमक भूमिका मांडली असून अजित पवार यांनी छगन भुजबळ यांना अडीच वर्ष उपमुख्यमंत्री करावे आणि छगन भुजबळ यांना मंत्रिपदापासून डावलून ओबीसी समाजाच्या मतांचा अजित पवार यांनी अपमान केला असल्याचा आरोप देखील लक्ष्मण हाके यांनी केला आहे.यावेळी लक्ष्मण हाके म्हणाले की, नागपूर येथे काल मंत्रिमंडळाचा विस्तार झाला. त्यामध्ये धनंजय मुंडे आणि पंकजा मुंडे यांना स्थान दिले. यामुळे ओबीसी समाजातील प्रत्येक व्यक्तिला आनंद झाला. पण दुसऱ्या बाजूला मागील कित्येक वर्षापासून ओबीसी समाजाला न्याय मिळावा, यासाठी छगन भुजबळ हे कायम संघर्ष करीत राहिले असून त्यांना मंत्रिमंडळात स्थान देण्यात आले नाही. तसेच दुसऱ्या बाजूला गोपीचंद पडळकर यांना देखील मंत्री मंडळात स्थान देण्यात आले नाही. यामुळे ओबीसी समाजात प्रचंड नाराजी आहे. यामुळे या दोन नेत्यांना मंत्रिमंडळातून का डावलण्यात आले आहे. याबाबतच उत्तर राज्यातील ओबीसी समाजाला देण्यात यावं , अशी समाजाची मागणी आहे.तसेच ते पुढे म्हणाले की, विधिमंडळातील सर्वात ज्येष्ठ सभासद म्हणून छगन भुजबळ असून त्यांना मंत्रिमंडळातून का डावलण्यात आले. त्यामागे नेमकी कोणती कारणे होती. याबाबत अजित पवार यांनी समोर येऊन उत्तर द्यावे, अडीच वर्षाच्या मंत्रिपदाचा पायंडा पाडणारे अजित पवार यांनी छगन भुजबळ यांना अडीच वर्ष उपमुख्यमंत्री देणार असल्याचे पुढे सांगावे, आम्ही सर्व शांत बसू आणि छगन भुजबळ यांना अडीच वर्ष उपमुख्यमंत्री पद द्यावे, अशी मागणी यावेळी त्यांनी केली.तसेच ते पुढे म्हणाले की, शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील आणि कर्जत जामखेडचे आमदार रोहित पवार यांना मंत्रिमंडळात स्थान देऊन(छगन भुजबळ आणि गोपीचंद पडळकर) या दोघांचा बळी घ्यायचा, ही अजित पवार यांची जातीयवादी मानसिकता आहे. तसेच विधानसभा निवडणुकीत महायुतीच्या बाजूने राज्यातील ओबीसी जनतेने मतदान केले आहे. त्या मतदानाचा अजित पवार यांनी अपमान केला असल्याची भूमिका त्यांनी मांडली. त्या पार्श्वभूमीवर ओबीसी समाजाचे नेते लक्ष्मण हाके यांनी आक्रमक भूमिका मांडली असून अजित पवार यांनी छगन भुजबळ यांना अडीच वर्ष उपमुख्यमंत्री करावे आणि छगन भुजबळ यांना मंत्रिपदापासून डावलून ओबीसी समाजाच्या मतांचा अजित पवार यांनी अपमान केला असल्याचा आरोप देखील लक्ष्मण हाके यांनी केला आहे. यावेळी लक्ष्मण हाके म्हणाले की, नागपूर येथे काल मंत्रिमंडळाचा विस्तार झाला.

### भुजबळांना का डावलण्यात आले

ओबीसी समाजातील प्रत्येक व्यक्तिला आनंद झाला. पण दुसऱ्या बाजूला मागील कित्येक वर्षापासून ओबीसी समाजाला न्याय मिळावा, यासाठी छगन भुजबळ हे कायम संघर्ष करीत राहिले असून त्यांना मंत्रिमंडळात स्थान देण्यात आले नाही. तसेच दुसऱ्या बाजूला गोपीचंद पडळकर यांना देखील मंत्री मंडळात स्थान देण्यात आले नाही. यामुळे ओबीसी समाजात प्रचंड नाराजी आहे. यामुळे या दोन नेत्यांना मंत्रिमंडळातून का डावलण्यात आले आहे. याबाबतच उत्तर राज्यातील ओबीसी समाजाला देण्यात यावं , अशी समाजाची मागणी आहे.तसेच ते पुढे म्हणाले की, विधिमंडळातील सर्वात ज्येष्ठ सभासद म्हणून छगन भुजबळ असून त्यांना मंत्रिमंडळातून का डावलण्यात आले.

# घराणेशाहीवर बोलणाऱ्यांनी आधी कर्तृत्व दाखवा!

## कॅबिनेट मंत्री चंद्रशेखर बावनकुळे : विरोधकांच्या टीकेचा घेतला समाचार

। पुणे ।महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**'घराणेशाहीवर बोलणाऱ्यांनी अगोदर मंत्र्यांचे कर्तृत्व बघितले पाहीजे. मंत्रीपदाची शपथ घेणाऱ्यांना घराणेशाहीच्या आधारावर नव्हे, तर त्यांच्या कर्तृत्वाच्या आधारावर मंत्रीपदाची संधी मिळालेली आहे. घराण्याच्या आधारावर एखाद्याच्या कर्तृत्वाचा निर्णय तुम्ही कसा कराल? चांगले काम करणाऱ्यांना संधी दिलेली आहे.' अशा शब्दात भाजपचे प्रदेशाध्यक्ष व राज्याचे नवनिर्वाचित कॅबिनेट मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विरोधकांच्या टिकेचा समाचार घेतला.**



कॅबिनेट मंत्रीपदाची शपथ घेतल्यानंतर बावनकुळे यांनी सोमवारी पहिल्यांदाच पुण्याला भेट दिली. बावनकुळे यांनी पुणे पुस्तक महोत्सवाला भेट देत माध्यमांशी संवाद साधला. 'महाराष्ट्र व देशाच्या कानाकोपऱ्यातुन नागरीक लाखोंच्या संख्येने सहभागी झाले आहेत. गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये या आयोजनाची नोंद घेतली जाणार आहे' असे त्यांनी नमुद केले. राज्य मंत्रीमंडळाच्या विस्तारात छगन भुजबळ, सुधीर मुनगंटीवार यांच्यासह अनेक आमदारांना डावलण्यात आले, त्याविषयी बावनकुळे म्हणाले, 'मंत्रीपदी संधी देण्याचा प्रत्येक पक्षाचा आपला निर्णय असतो. भाजपमध्ये केंद्रीय मंडळ मंत्रीपदाबाबत निर्णय घेते.

परंतु, राष्ट्रवादी कॉंग्रेसमध्ये अजित पवार व शिवसेनेमध्ये एकनाथ शिंदे यांच्याकडे पक्षातील निर्णयाचे अधिकार आहेत. त्यामुळे नाराज होण्याचे काही कारण नाही. काही काळापुरते थोडे थांबावे लागते, मग पुढे जावे लागते. त्यामुळे छगन भुजबळ यांना तिन्ही पक्षात मानाचे स्थान आहे. सुधीर मुनगंटीवार हे तर आमच्या पक्षाचे प्रमुख नेते आहेत. कदाचित केंद्रीय मंडळ त्यांच्यावर मोठी जबाबदारी देणार असेल.'

**बीड व परभणी येथील घटनांची सखोल चौकशी**

'मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासमोर बीड व परभणी येथील घटनांबाबत विरोधी पक्षांनी प्रस्ताव मांडला. या दोन्ही घटना गंभीर आहेत. त्यांची सखोल चौकशी व्हावी, याबाबत मुख्यमंत्र्यांनी सभागृहात सांगितले आहे. परभणीत आरोपी पकडल्यानंतर प्रक्षोभक आंदोलन झाले. अशा आंदोलनात कार्यकर्त्यांना सांभाळुन घेतले पाहीजे. या दोन्ही घटनांबाबत चौकशी होईल. मुख्यमंत्री त्याबाबत सभागृहात माहिती देतील.' असे बावनकुळे यांनी बीड व परभणी येथील घटनांबाबतची माहिती दिली.

### विदर्भाला न्याय मिळेल...

आमदारांच्या नाराजीबाबत बावनकुळे म्हणाले, 'काही आमदार अधिवेशन सोडुन आले, त्याला वेगवेगळी कारणे आहेत. मी पुणे पुस्तक महोत्सवासाठी आलो, त्याप्रमाणे अनेक आमदार त्यांच्या नातेवाईकांकडे कार्यक्रमानिमित्त गेले आहेत. अधिवेशनात आमदारांची संख्या मोठी आहे. त्यामुळे अधिवेशन चांगले होईल. विदर्भाला न्याय देण्यासाठी या अधिवेशनातुन काम होईल.'

### मी आठवले यांची क्षमा मागितली..

केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांच्या नाराजीबद्दल बावनकुळे यांनी आपले म्हणणे मांडले. ते म्हणाले, 'सर्वांना आम्ही निमंत्रण दिले, केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांना ही निमंत्रण दिले होते. ते निमंत्रण त्यांना सन्मानाने मिळाले नसेल, ही माझ्याकडुन चुक झाली, मी स्वतः आठवले यांची क्षमा मागितली आहे. आठवले यांना आमच्या सरकारमध्ये योग्य स्थान आहे. त्यांचे म्हणणे सरकार, मुख्यमंत्री ऐकुन घेतील.'

## बांधकाम रखडलेल्या प्रकल्पांमध्ये मुंबई अव्वल

# 11 हजार गृहप्रकल्पांना 'महारेरा'ची नोटीस!

### पुण्याचा दुसरा नंबर : साडेतीन हजार गृहप्रकल्पांचे बांधकाम रखडले!

। पुणे ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**बांधकाम रखडलेल्या गृहनिर्माण प्रकल्पांची महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरणाने (महारेरा) झाडाझडती घेण्यास सुरुवात केली आहे. राज्यातील तब्बल ११ हजार गृहनिर्माण प्रकल्पांना आतापर्यंत 'कारणे दाखवा' नोटीस बजावण्यात आली आहे. मुंबई महाप्रदेशात सर्वाधिक सव्वापाच हजार गृहप्रकल्प अपूर्णावस्थेत असून, त्यापाठोपाठ पुणे विभागातील साडेतीन हजार गृहप्रकल्पांचे बांधकाम रखडले आहेत.**




'महारेरा'कडे नोंदणी करताना प्रत्येक विकासकाला आपला प्रकल्प प्रत्यक्षात कधी पूर्ण होणार, याची तारीख आपल्या प्रस्तावात स्पष्टपणे नोंदवावी लागते. बांधकामाच्या स्थितीचा त्रैमासिक अहवाल वेळोवेळी संकेतस्थळावर सादर करावा लागतो. गृहप्रकल्पाचे काम पूर्ण झाल्यावर त्याचे भोगवटा प्रमाणपत्र, प्रकल्प पूर्णत्वाचे प्रमाणपत्र, प्रपत्र सादर करणे किंवा प्रकल्पासाठी मुदतवाढीचा अर्ज करणे आवश्यक आहे.

> नोंदणी झालेल्या प्रत्येक प्रकल्पाने त्यांच्या बांधकामाचा त्रैमासिक अहवाल सादर करून बांधकाम प्रकल्पाच्या स्थितीची माहिती 'महारेरा'च्या संकेतस्थळावर अद्ययावत करणे आवश्यक आहे. परंतु, राज्यात १० हजार ७७३ प्रकल्प रखडले असून, त्यामध्ये अनेक घर खरेदीदारांची गुंतवणूक अडकून पडली आहे. नियमानुसार, या प्रकल्पांनी भोगवटा प्रमाणपत्र सादर करावे किंवा मुदतवाढीची प्रक्रिया करावी, अन्यथा नोटिशीनुसार तीस दिवसांची मुदत संपल्यावर या प्रकल्पांवर कारवाई केली जाईल.
>
> **- मनोज सौनिक,** अध्यक्ष, महारेरा

मात्र, राज्यात तब्बल १० हजार ७७३ गृहप्रकल्पांनी या नियमांची पूर्तता केलेली नाही. त्यामुळे या रखडलेल्या बांधकाम प्रकल्पांच्या पूर्ततेविषयी 'महारेरा'कडे कोणतीही माहिती नाही. या अनियमिततांची गंभीर दखल 'महारेरा'ने घेतली असून, या सर्व प्रकल्पांना 'कारणे दाखवा' नोटीस बजावली आहे.

### तर नोंदणी स्थगित किंवा रद्द होऊ शकते

राज्यातील रखडलेल्या गृहप्रकल्पांमध्ये घर खरेदी केलेले अनेक गृहखरेदीदार आणि गुंतवणूकदार अडचणीत सापडले आहेत. त्याची गंभीर दखल 'महारेरा'ने ही कारवाई केली आहे. 'कारणे दाखवा' नोटिशीला उत्तर न देणाऱ्या प्रकल्पांची थेट नोंदणी रद्द किंवा स्थगित करणे, त्यांच्यावर दंडात्मक कारवाईसोबत सदनिकेच्या खरेदी-विक्री व्यवहाराची नोंदणी न करणे आदी सूचना सह जिल्हा निबंधकांना दिल्या जाणार असून, प्रकल्पाचे बँक खाते गोठविण्याची कारवाई केली जाणार आहे.

### विभाग - रखडलेले प्रकल्प

मुंबई महाप्रदेश - ५२३१
पुणे परिसर - ३४०६
नाशिक - ८९५
नागपूर - ५४८
संभाजीनगर - ५११
अमरावती - २०१
दादरा-नगर हवेली - ४३
दमण-दीव - १८
एकूण - १०,७७३



---

## महिलांच्या स्वावलंबनासाठी शिलाई केंद्र !

### अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील : भोसरी येथे शिलाई केंद्राची उभारणी!

। पिंपरी-चिंचवड
।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पारंपारिक शिवणकामापेक्षा बाजारपेठेतील मागणी ओळखून त्यासाठी आवश्यक प्रशिक्षण घेऊन अत्याधुनिक पद्धतीच्या शिवणकामावर भर देऊन उत्पादनाची गुणवत्ता अधिकाधिक वाढवावी. तसेच जास्तीत जास्त महिलांनी महापालिकेच्या वतीने उभारण्यात आलेल्या शिलाई केंद्राचा लाभ घ्यावा, असे प्रतिपादन महापालिका अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांनी केले.**



> अत्याधुनिक पद्धतीच्या शिवणकामाचे प्रशिक्षण घेतल्यास बाजारपेठेत जास्त मागणी असलेल्या गोष्टी तयार करण्याचे कसब विकसित होईल. तसेच हे शिलाई केंद्र उत्तम पद्धतीने चालविण्यास मदत होईल.
>
> **-प्रदीप जांभळे-पाटील,** अतिरिक्त आयुक्त.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, बीएमसी सॉफ्टवेअर इंडिया आणि थिंक शार्प फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने भोसरी येथे शिलाई केंद्राची उभारणी करण्यात आली असून या केंद्राच्या उद्घाटन प्रसंगी अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांनी उपस्थित महिलांशी संवाद साधला. त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी निळकंठ पोमण, उपआयुक्त राजेश आगळे, सहाय्यक आयुक्त तानाजी नरळे, बीएमसी सॉफ्टवेअर इंडियाचे सीएसआर हेड चावला दिवानजी, व्यवस्थापक गिरीश के., थिंक शार्प फाऊंडेशनचे संतोष फड, आकाश देवकर, अमित कोतवाल, यांच्यासह टाटा कम्युनिटी इनिशिएटिव्हस ट्रस्ट (टाटा स्ट्राइव्ह) सक्षमा उपक्रमाचे सदस्य तसेच महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या

दरम्यान, अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांनी शिलाई केंद्राची पाहणी केली.यावेळी महिलांनी त्यांनी बनविलेल्या कापडी वस्तू दाखविल्या. तसेच काही महिलांनी उपस्थित केलेल्या शंकांचे निराकरण जांभळे पाटील यांनी केले.

### महिलांना योग्य प्रशिक्षणाची व्यवस्था...

अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे म्हणाले, महिलांचे सक्षमीकरण करण्यासाठी तसेच त्यांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी महापालिकेच्या वतीने विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. त्यास महिलांचा देखील उत्तम प्रतिसाद मिळत असून ही समाधानकारक बाब आहे. महिलांमध्ये असणाऱ्या विविध कलागुणांना उत्तम व्यासपीठ उपलब्ध करून देऊन त्यांना स्वावलंबी करण्यासाठी महापालिका प्रयत्नशील आहे. त्याच धर्तीवर महापालिका आणि बीएमसी सॉफ्टवेअर इंडिया आणि थिंक शार्प फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने शिलाई केंद्राची उभारणी करण्यात आली आहे. ज्या महिलांना शिलाई मशीनसाठी भांडवल तसेच जागा उपलब्ध नाही अशा महिला शिलाई केंद्रात उपलब्ध असणाऱ्या शिलाई मशीनवर काम करू शकतात. तसेच ज्या महिलांना प्रशिक्षणाची आवश्यकता असल्यास त्या महिलांना योग्य प्रशिक्षणाची व्यवस्था देखील या ठिकाणी करण्यात येणार असल्याची माहिती जांभळे पाटील यांनी दिली.



## भूमिका

**बुद्धिबळ जगज्जेतेपद लढतींच्या १३८ वर्षांच्या इतिहासातील सर्वांत मोठी घोडचूक चीनच्या डिंग लिरेनकडून १२ डिसेंबर रोजी पटावर घडली आणि भारताचा दोम्माराजू गुकेश नाट्यमयरीत्या सर्वांत युवा जगज्जेता बनला. पुरुष बुद्धिबळ क्षेत्रामध्ये भारत आता महासत्ता बनला आहे हे गुकेशच्या जगज्जेतेपदाने सिद्ध केले. या वर्षी भारताने पुरुष ऑलिम्पियाडमध्ये सुवर्णपदक जिंकले.**

# सोव्हिएत वर्चस्वाचे भारतीय प्रारूप?

त्या वाटचालीत आपण चीनचाही पाडाव केला होता हे उल्लेखनीय. त्या लढतीमध्ये लिरेनने गुकेशशी खेळणे टाळले होते, हेही तितकेच दखलपात्र. सध्या २७०० एलो गुणांकनाच्या वर सहा भारतीय बुद्धिबळपटू आहेत. तितक्या संख्येने केवळ अमेरिकेचे ग्रँडमास्टर आहेत. चीनचे चार आणि रशियाचे दोनच. एके काळी भारताचा केवळ विश्वनाथन आनंद 'क्लब-२७००'मध्ये होता. जागतिक क्रमवारीत पहिल्या पाचात दोघे भारतीय (अर्जुन आणि गुकेश) आहेत. भारताच्या टॉप-थ्री व्यतिरिक्त विदिथ गुजराती, अरविंद चिदम्बरम, निहाल सरीन, रौनक साधवानी, मुरली कार्तिकेयन, ल्युक मेन्डोन्सा, एस. एल. नारायणन हे सगळेच चमकू लागले आहेत. यांतील रौनक आणि ल्युक हे १८ वर्षांचे आहेत. तर निहाल २० वर्षांचा. म्हणजे हा 'पूल' किती मोठा आहे, यावरून किती काळ




भारत वर्चस्व गाजवणार याचा अंदाज बांधता येईल. सोव्हिएत काळात बरेचसे बडे ग्रँडमास्टर वर्चस्वासाठी आपसांत लढायचे. त्यांच्यापेक्षा अधिक निकोप स्पर्धा भारताच्या उच्चतम खेळाडूंमध्ये जगज्जेतेपदासाठी दिसून येऊ शकते.महिलांच्या बुद्धिबळविश्वात चीन आजही निर्विवाद महासत्ता आहे आणि भारताला त्यांच्या आसपास जाण्यासाठी अजून अवधी आहे. आर. वैशाली, दिव्या देशमुख आणि वंतिका अगरवाल या युवा ब्रिगेडची सध्याची कामगिरी पाहता, तो दिवस फार दूर नाही. पुरुषांमध्ये मात्र ज्या वेगाने भारताची वाटचाल सुरू आहे, ते पाहता पूर्वीच्या सोव्हिएत रशियाच्या वर्चस्वाचे दुसरे मॉडेल या देशात विकसित होते की काय असे वाटावे. एका विख्यात ग्रँडमास्टरने भारताच्या विद्यामान तेजस्वी त्रिमूर्तीची तुलना त्या युगाशी केली. गुकेश, अर्जुन एरिगेसी आणि आर. प्रज्ञानंद हे ते तिघे जण. १९५० आणि १९६०च्या दशकांमध्ये मिखाइल बॉटविनिक, वॅसिली स्माइस्लॉव्ह, मिखाइल ताल, टायग्रिन पेट्रोशियान आणि बोरिस स्पास्की हे आलटून-पालटून जगज्जेते होत राहिले. ही शृंखला मोडली अर्थातच अमेरिकेच्या बॉबी फिशरने. पण अल्पकाळापुरतीच. नंतर पुन्हा एकदा बराच काळ अनातोली कारपॉव, गॅरी कास्पारॉव, व्लादिमीर क्रॅमनिक असे सोव्हिएत-रशियन वर्चस्व कायम राहिले. ती परिस्थिती आता बदलली आहे.रशियन बुद्धिबळपटू आजही चमकत आहेत. सर्गेई कार्याकिन आणि इयन नेपोम्नियाशीसारखे बुद्धिबळपटू आव्हानवीरही ठरले. पण प्रथम आनंद आणि नंतर कार्लसन युगामुळे रशियन वर्चस्वाला घरघर लागली, ती कायमची. विश्वनाथन आनंद या वर्चस्वकालातही अचल राहिला. त्याचे युग कार्सलनने संपवले, तरी आनंदमुळे प्रेरित होऊन जय्यत तयारीनिशी आलेल्या नवीन, ताज्या दमाच्या भारतीय बुद्धिबळपटूंविरुद्ध किती काळ तग धरता येईल, याविषयी कार्लसनही साशंक आहे. आजच्या युगात नवीन प्रतिभावान बुद्धिबळपटू भारत, चीन, उझबेकिस्तान, तुर्कीये, इराण येथून अधिक सातत्याने येत आहेत. अमेरिकेची सध्याची ताकद ही प्राधान्याने स्थलांतरित बुद्धिबळपटूंमुळे दिसून येते. खुद्द अमेरिकी भूमीतून युवा प्रतिभावान ग्रँडमास्टर इतक्या सातत्याने निर्माण होत नाहीत. तेथेही चिनी आणि भारतीय स्थलांतरितांची उपस्थिती ठळकपणे दिसून येते. आनंदमुळे भारतात बुद्धिबळाविषयी आदर, आत्मीयता, उत्सुकतेची जी लाट निर्माण झाली, तितकी ती कार्लसनमुळे त्याच्या देशात किंवा युरोपात निर्माण होऊ शकली नाही. त्यामुळे कार्लसनचा उदय आणि वर्चस्व हे निर्विवाद असले, तरी ते बरेचसे 'अपघाती' ठरते. रशियाच्या आणि आनंदच्या ओसरत्या वर्चस्वातून निर्माण झालेल्या पोकळीचा फायदा कार्लसनने पुरेपूर उचलला. आता कार्लसनच्या माघारीने निर्माण झालेल्या पोकळीचा फायदा चिनी आणि भारतीय बुद्धिबळपटूंनी घेतला, हा योगायोग नाही.

## प्रासंगिक »

# प्रहसनी पार्लमेंट

***अमूर्त विषयांवरील आरोपांपेक्षा मूर्त आव्हानांवर कृतिशील होणे अधिक महत्त्वाचे आणि दूरगामी उपयोगाचे, याचे गांभीर्य संसदेस हवे...***

ही विंदांच्या कवितेची ओळ 'संविधान' या विषयावर संसदेत झालेली चर्चा पाहून आठवणे अयोग्य नाही. घटनेवर चर्चेची मागणी काँग्रेसने केली होती आणि त्या चर्चेला पंतप्रधानांनी उत्तर दिले. राजकीय अभ्यासक, पत्रकार आदी अनेकांस कर्तव्याचा भाग म्हणून या चर्चेची दखल घ्यावी लागली. जगातील सर्वात मोठी लिखित घटना जेव्हा संसदीय चर्चेचा विषय ठरते तेव्हा त्या चर्चेअंती काही किमान भरीव हाती लागावे अशी अपेक्षा रास्त. देशातील बुद्धिमान, प्रकांड समाजाभ्यासक, अनेक पाश्चात्त्य राज्यपद्धतींचे भाष्यकार यांच्यात प्रदीर्घ काळ वाद-संवाद-प्रतिवाद होऊन आकारास आलेल्या संविधान या विषयावर जेव्हा आपले लोकप्रतिनिधी दोन दोन दिवस चर्चा करतात तेव्हा त्याच्या फलिताबद्दल किमान आशा असायला हवी. या चर्चेचा हा हिशेब... तो मांडताना पहिला मुद्दा या चर्चेची गरज हा.

"काँग्रेसच्या एका कुटुंबाने संविधानाला इजा पोहोचवण्यास कोणतीही कसर सोडली नाही. ५५ वर्षे एकाच कुटुंबाने राज्य केले. त्यामुळे देशात काय काय झाले हे जाणून घेण्याचा जनतेला अधिकार आहे. या कुटुंबाचे कुविचार, कुरीती, कुनीती याची परंपरा निरंतर सुरू आहे.

# पहिल्या पंतप्रधानांबद्दल पुरेशी माहिती नाही

प्रत्येक स्तरावर या परिवाराने संविधानाला आव्हान दिले"- अशा घणाघाती शब्दांत काँग्रेसमधल्या 'एका कुटुंबा'चा 'खरा इतिहास' जाणून घेण्याचे आवाहन देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नुकतेच केले आहे. पण या कुटुंबाचा १९६३ पूर्वीचा इतिहास मोदींनी एकतर फारच पूर्वग्रहदूषित दृष्टीने पाहिला आहे, किंवा स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांच्याबद्दल आताच्या पंतप्रधानांना पुरेशी माहिती नाही, असे या भाषणातून दिसून येते.पंतप्रधान मोदींनी लोकसभेत संविधानावरील चर्चेला उत्तर देताना, दिशाभूल करण्याच्या (त्यांच्या नेहमीच्या) पद्धतीप्रमाणे 'पंडित नेहरू पंतप्रधान पदी निवडून आलेले नसतानाही १९५१ मध्ये त्यांनी घटना दुरुस्ती करून अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर घाला घातला आणि तत्कालीन मुख्यमंत्र्यांना पत्र लिहून संविधान आड येत असेल तर बदलले पाहिजे असा सल्ला दिला' अशी विधाने



केलेली दिसतात.वस्तुस्थिती अशी आहे की ब्रिटिश पार्लमेंटच्या १९४६ च्या इंडियन इंडिपेन्डन्स ॲक्टनुसार (कॅबिनेट मिशन प्लॅन प्रमाणे) देशाचे पहिले काळजीवाहू सरकार (इंटेरिम गव्हर्नमेंट) दोन सप्टेंबर १९४६ पासून स्थापन झाले ज्याचे उपाध्यक्ष (व्हाईस प्रेसिडेंट) पंडित नेहरू होते. आणि १९३५ च्या गव्हर्नमेंट ऑफ इंडिया ॲक्टप्रमाणे स्थापन झालेल्या संविधान सभेने (घटना समितीने) सुमारे तीन वर्षांच्या चर्चेअंती राज्यघटना तयार करून या संविधानाला 'अंगीकृत, अधिनियमित आणि स्वत:प्रत अर्पण' करेपर्यंत, देशात हेच काळजीवाहू सरकार नेहरूंच्या नेतृत्वाखाली काम करत होते. भारतीय राज्यघटनेनुसार सार्वत्रिक निवडणुका होऊन १९५२ पासून देशाचे स्वातंत्र्योत्तर पहिले लोकनियुक्त सरकार स्थापन झाले, त्याचे निवडलेले पंतप्रधानही पंडित नेहरूच होतेनेहमीच्या पद्धतीने या मुद्ध्यावर लोकांची दिशाभूल करताहेत असेच म्हणावे लागेल. आता दुसरी दिशाभूल १९५१ च्या घटना दुरुस्तीबाबत. या पहिल्या घटनादुरुस्तीने प्रामुख्याने अनुच्छेद १५, १९ आणि ३१ मध्ये स्पष्टता आणण्यासाठी काही बदल केले गेले. यांत प्रामुख्याने सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या समाज घटकांकरिता विशेष तरतुदी, जमीन धरणेतील सुधारणा व इतर सामाजिक सुधारणा कायदे करण्यातील अडथळे दूर करणे, तसेच राखीव जागा धोरणात स्पष्टता आणणे व मूलभूत अधिकाराच्या बाबतीत स्पष्टता व देशाच्या सुरक्षे व एकात्मतेच्या दृष्टीने त्यावर 'वाजवी बंधने' आणण्याबाबतच्या सरकारच्या अधिकारांवर मर्यादा व कक्षांची स्पष्टता करणे हे उद्देश होते.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# सरकारकडून आम्हाला अपेक्षा आहेत!

## भुजबळांना मंत्रिमंडळात स्थान नाही : मनोज जरांगे



। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**महायुती सरकारच्या मंत्रिमंडळाचा विस्तार १५ डिसेंबर रोजी नागपूरमध्ये पार पडला. या मंत्रिमंडळामध्ये महायुतीच्या अनेक दिग्गज नेत्यांना डावलण्यात आलं. त्यामुळे महायुतीमधील काही नेते नाराज झाले आहेत. यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे नेते छगन भुजबळ आणि दिलीप वळसे पाटील यांना मंत्रिमंडळात स्थान देण्यात आलेलं नाही. त्यामुळे छगन भुजबळ आणि दिलीप वळसे पाटील हे नाराज असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरु आहे. मात्र, दिलीप वळसे पाटील यांनी आपण नाराज नसल्याचं स्पष्टीकरण दिलं आहे.**

तसेच छगन भुजबळ यांनी आपली नाराजी जाहीरपणे बोलून दाखवली आहे. एवढंच नाही तर जहाँ नहीं चैना, वहाँ नहीं रहना, असं सूचक विधान करत आपण कार्यकर्त्यांशी बोलून पुढची भूमिका जाहीर करणार असल्याचंही छगन भुजबळ यांनी म्हटलं. त्यामुळे आता छगन भुजबळ नेमकं काय भूमिका घेणार? याकडे अनेकांचं लक्ष लागलं आहे. तर छगन भुजबळ यांची नाराजी दूर केली जाईल, असं राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाच्या नेत्यांकडून सांगितलं जात आहे. आता दिलीप वळसे पाटील यांनी छगन भुजबळ यांच्या नाराजीबाबत भाष्य केलं आहे. भुजबळांच्या नाराजीबाबत विचालं आलं असता वळसे पाटील म्हणाले की, 'छगन भुजबळ हे मोठे नेते आहेत, ते नाराज होऊ शकतात', असं वळसे पाटील यांनी म्हटलं. ते झी २४ तास या वृत्तवाहिनीशी बोलत होते.महायुती सरकारच्या मंत्रिमंडळात मंत्रिपदाची संधी न मिळाल्यामुळे दिलीप वळसे पाटील हे देखील नाराज झाल्याची चर्चा सुरु आहे. मात्र, यासंदर्भात वळसे पाटील यांनी स्वत: प्रतिक्रिया देत म्हटलं की, "पक्षावर माझी काहीही नाराजी नाही. पक्षाने जो निर्णय घेतला आहे तो मला मान्य आहे."महायुती सरकारच्या मंत्रिमंडळात स्थान न मिळाल्यामुळे छगन भुजबळ यांच्यासह अनेकजण नाराज असल्याचं बोललं जात आहे. तसेच तुम्ही देखील नाराज आहात का? असा प्रश्न विचारला असता यावर वळसे पाटील म्हणाले, "छगन भुजबळ हे मोठे नेते आहेत. तसेच अनेक जण नाराज देखील असतील. मात्र, मी नाराज नाही", असं वळसे पाटील यांनी म्हटलं.मराठा आरक्षणाची मागणी सातत्याने लावून धरणारे मनोज जरांगे यांनी पुन्हा एकदा आंदोलन करणार असल्याचं जाहीर केलं आहे. सरकारने अधिवेशन काळात आरक्षण द्यावं आणि आमच्या मागण्या मान्य कराव्यात, सरकार म्हणून ते मागण्या मान्य करतील अशी अपेक्षा आहे असं मनोज जरांगे म्हणाले आहेत. दरम्यान त्यांना छगन भुजबळ यांना मंत्रिपद मिळालेलं नाही याबाबत प्रतिक्रिया विचारली असता त्यावरही त्यांनी भाष्य केलं आहे.सरकारला माझी विनंती आहे की अधिवेशन सुरु झालं आहे. या अधिवेशनात मराठा आरक्षणाचा प्रश्न मार्गी लावावा.

मराठ्यांना सरसकट कुणबी प्रमाणपत्र द्यावं कारण आम्ही पूर्वीपासून ओबीसी आहोत. आमच्यावरचे गुन्हे मागे घ्यावेत. तसंच तिन्ही गॅझेट लागू करावेत, शिंदे समितीचं काम पुन्हा सुरु करावं, सगे-सोयऱ्यांची अंमलबजावणी या आमच्या आठ ते दहा मागण्या आहेत त्या मागण्या सरकारने मान्य कराव्या. आम्हाला आशा आहे की सरकार हे करेल. मी राजकारणाच्या विषयात पडणार नाही. राजकारण किंवा इतर जे काही विषय आहेत ते त्यांचे वैयक्तिक विषय आहेत. आरक्षणाच्या बाबतीत मी काही कुणाला सोडणार नाही. बाकी राजकीय विषयात ढवळाढवळ करणार नाही.

आम्ही तारीख जाहीर करणार आहोत. त्या तारखेला महाराष्ट्रातले सगळे मराठे ताकदीने उपस्थित राहतील." असं मनोज जरांगेयांनी म्हटलं आहे. तसंच छगन भुजबळ यांच्यावरही भाष्य केलं आहे.

छगन भुजबळ यांना का डावललं हे मला माहीत नाही. तो त्यांचा राजकीय प्रश्न आहे. त्याला का दिलं होतं ते पण माहीत नाही. आता का दिलं नाही ते पण माहीत नाही. मराठा आरक्षणाच्या मारेकऱ्यांशी आम्हाला काही घेणंदेणं नाही. गोरगरीबांना अगदी ओबीसींनाही त्यांनी काही खाऊ दिलेलं नाही. पण तो राजकीय विषय आहे त्यात मी काहीही बोलणार नाही. मला त्याची काही गरज वाटत नाही. असं म्हणत मनोज जरांगेंनी छगन भुजबळांबाबत प्रतिक्रिया दिली आहे.

### मी एका गरीब घरचा कार्यकर्ता

आता जे मंत्रिमंडळ बनलं, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी कदाचित माझा विचार केलाही असेल पण काही आजी-माजी मंत्री आहेत. काही मातब्बर नेत्यांची मुलं आहेत. काही मोठ्या घरची लोक आहेत. पण मी एका गरीब घरचा कार्यकर्ता आहे. त्यामुळे मला संघर्ष करणं भाग आहे. हे आता यावरून सिद्ध झालं. आता पुढचं पाऊल हे एकनाथ शिंदे जे ठरवतील ते असेल. मी संघर्ष करत राहणार", असं आमदार प्रकाश सुर्वे यांनी म्हटलं. आज झालेल्या मंत्रिमंडळ विस्तारामध्ये आपण पाहिलं तर अशा लोकांना संधी मिळाली ज्या लोकांचं पक्षात काहीच योगदान नाही. मंत्रिपदासाठी काही पदाची गरज नाही हे देखील लोकांना दिसलं. ज्यांच्यावर आक्षेप आहेत अशाही लोकांना मंत्रिपद मिळाले.

---

# नाराज नेत्यांवर जबाबदाऱ्या सोपवण्यात येणार

## सुधीर मुनंगटीवार यांच्याशी नीट चर्चा झाली : देवेंद्र फडणवीस

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**भाजपाचे ज्येष्ठ नेते आणि माजी प्रदेशाध्यक्ष सुधीर मुनगंटीवार यांना यंदाच्या नव्या मंत्रिमंडळात घेण्यात आलेले नाही. भाजपाच्या अनेक मंत्र्यांना यंदा डच्चू देण्यात आला आहे. त्यामुळे या नेत्यांमध्ये नाराजीनाट्य रंगलं आहे. दरम्यान, त्यांची समजूत काढली जात असून पक्षातील इतर जबाबदाऱ्या त्यांच्यावर सोपवण्यात येणार असल्याचे संकेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत.**

नागपुरातील विधानभवनाबाहेर बोलत होते. सुधीर मुनगंटीवार म्हणाले, मी नाराज नाही, पक्षाने जो आदेश दिला, जबाबदारी दिली त्याचं मी पालन केलं आहे. मला याची जाणीव आहे की मी विधानसभेत आलो असतो तर अनेक जण अनेक प्रश्न विचारतील. त्या प्रश्नांची उत्तरं देण्यापेक्षा मौनं, सर्वार्थ साधनं हे मी मानतो तसंच श्रद्धा आणि सबुरी ठेवली पाहिजे. संघटनेच्या नव्या आदेशाची वाट पाहतो आहे. सभागृहाचं आज काहीही काम नाही. मी मंत्री असतो तर सही करावी लागते.

तारांकित प्रश्न मांडले जातात. आत्ता काम काही नाही.



तारांकित प्रश्न नाहीत त्यामुळे मी आलो नाही. या अधिवेशनात औचित्याचे मुद्दे उपस्थित करेन. जनतेचे प्रश्न मांडावेच लागतील. मला मंत्रिमंडळात ज्यांनी घेतलं नाही तेच उत्तर देऊ शकतात की मला मंत्री का केलं नाही. मला काही सांगता येणार नाही. मला मंत्रिमंडळात घेतलं जाणार नाही अशी जाणीव मला कुणी करुन दिली नाही. मी संघटनेवर विश्वास ठेवणारा माणूस आहे. मला प्रमोद महाजन यांचं वाक्य आठवतं आहे पावला-पावलावर मनाविरुद्ध घडत असताना जो काम पुढे नेतो तोच खरा कार्यकर्ता. हे वाक्य मी माझ्या मनात जपून ठेवलं आहे. असंही सुधीर मुनगंटीवार म्हणाले.

माझं देवेंद्र फडणवीस यांच्याशी आणि चंद्रशेखर बावनकुळेंशी बोलणं व्हायचं पण मी मंत्रिमंडळात नाही हे काही मला जाणवलं नाही.

### मुनगंटीवार अतिशय अनुभवी नेते

माझं नाव मंत्रिमंडळात आहे हे सांगण्यात आलं होतं असंही सुधीर मुनगंटीवार म्हणाले. मला दोन्ही नेत्यांनी म्हणजेच देवेंद्र फडणवीस आणि चंद्रशेखर बावनकुळे या दोघांनीही नाव आहे हेच सांगितलं होतं, असंही मुनगंटीवार यांनी स्पष्ट केलं. माझी सुधीर मुनगंटीवार यांच्याशी नीट चर्चा झाली आहे. ते आमचे ज्येष्ठ नेते आहेत. पक्षाने काही लोकांना मंत्रिमंडळात न घेण्यामागे त्यांना काही विशिष्ट जबाबदारी देण्याचा मानस केला आहे. शेवटी पक्ष आणि सरकार या दोन्ही गोष्टी चालवायच्या असतात. त्यामुळे काहीवेळा सरकारमध्ये काम करणारे पक्षात तर पक्षात काम करणारे सरकारमध्ये काम करतात. सुधीर मुनगंटीवार अतिशय अनुभवी नेते आहेत.

# 1971 चा ऐतिहासिक फोटो हटवला!

## प्रियांका गांधींनी सोमवारी लोकसभेत उपस्थित केला मुद्दा

**। नवी दिल्ली ।**
**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**971 मध्ये पाकिस्तान सोबतच्या युद्धात भारताने मोठा विजय मिळवला होता. युध्दानंतर पाकिस्तानच्या सैन्याने शरणागती पत्करली होती. त्यावेळी झालेल्या समझोत्यावर स्वाक्षरी करतानाचा एक ऐतिहासिक फोटो आहे. सैन्यदलाच्या मुख्यालयात हा फोटो आठवण म्हणून लावण्यात आला होता. युध्दाप्रमाणेच त्यावेळचा एक फोटोही ऐतिहासिक ठरला होता. मात्र आता या फोटोवरून नवा वाद उफाळून आला आहे. आज संसदेत त्याचे पडसाद उमटले.**



हटवण्यात आलेल्या फोटोबाबत सरकारकडून अद्याप कोणताही खुलासा करण्यात आलेला नाही. अलिकडेच हा फोटो हटवण्यात आल्याचं समोर आले आहे. त्यावर कॉंग्रेसच्या वायनाडच्या नवनिर्वाचित खासदार प्रियांका गांधींनी सोमवारी लोकसभेत हा मुद्दा उपस्थित केला. पण अद्याप संरक्षण मंत्रालयाकडूनही यावरण कोणतेही स्पष्टीकरण देण्यात आलेलं नाही. भारत आणि बांग्लादेशातील स्थिती सध्या बिघडलेली आहे. या पार्श्वभूमीवर हा फोटो हटवण्यात आल्याचं समोर आल्याने तर्कवितर्क लढवले जात आहेत. पाकिस्तानचे सैन्य भारतीय सैन्यसमोर आत्मसमर्पण करत असलेला फोटो सैन्यदलाच्या मुख्यालयातून हटवण्यात आला आहे. ही अत्यंत दुर्दैवी बाब आहे. पाकिस्तानने पूर्व पाकिस्तान म्हणजेच आताच्या बांगलादेशवर आक्रमण केलं होतं. त्यामुळे भारताने पाकिस्तानसोबत युद्ध पुकारलं, 1971 मध्ये 3 डिसेंबर रोजी सुरू झालेले हे युद्ध 16 डिसेंबर रोजी संपले होते. पाकिस्तानच्या 90 हजार सैन्याने भारतीय सैन्यासमोर शरणागती पत्करली होती. पाकिस्तानचे तत्कालीन पूर्व विभाग प्रमुख लेफ्टनंट जनरल ए. ए. के. नियाझी यांनी भारतीय लष्कराचे तत्कालीन पूर्व विभाग प्रमुख लेफ्टनंट जनरल जगजितसिंग अरोरा यांच्यासमोर शरणागतीच्या कागदपत्रांवर स्वाक्षरी केली होती. ही सही करणाचा फोटो ऐतिहासिक ठरला होता.1971 च्या ऐतिहासिक विजयाची आठवण म्हणून हा फोटो दिल्लीत लष्कर प्रमुखांच्या कार्यालयात अनेक वर्षांपासून लावण्यात आला होता. आता हा फोटो काढून त्याजागी दूसरा फोटो लावण्यात आला आहे. त्यावरून कॉंग्रेसच्या नेत्या प्रियांका गांधी यांनी सोमवारी लोकसभेत नाराजी व्यक्त केली. १९७१ च्या युद्धातील तो फोटो भारताच्या नेतृत्वाचा आणि सैन्याने गाजवलेल्या अद्वितीय पराक्रमाचा ऐतिहासिक फोटो आहे. हा फोटो पूर्वीच्या जागी लावला जावा, अशी मागणी प्रियांका गांधींनी केली आहे. कॉंग्रेसच्या खासदार प्रियांका गांधी सोमवारी संसदेत घेऊन आलेल्या बॅगची सध्या जोरदार चर्चा होत आहे. प्रियांका गांधी यांच्याकडील या बॅगवर 'पॅलेस्टाईन' असे लिहिले होते. प्रियांका गांधी याचा ही बॅग घेतलेला फोटो कॉंग्रेसच्या प्रवक्त्या शमा मोहम्मद यांनी सोमवारी (१६ डिसेंबर) सोशल मिडिया प्लॅटफॉर्म एक्सवर पोस्ट केला आहे. या फोटोमध्ये प्रियांगा गांधी यांनी ही बॅग खांद्यावर अडकवलेली दिसत असून त्या हसताना दिसत आहेत.प्रियांका गांधी यांचा हा फोटो पोस्ट केल्यानंतर लगेच यावर प्रतिक्रिया येण्यास सुरूवात झाल्याचे पाहायला मिळाले. अनेकांनी अशी बॅग संसदेत घेऊन जाणे योग्य नसल्याचे म्हटले आहे. एका वापरकर्त्याने माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या नेतृत्वाखाली भारताने पूर्व पाकिस्तान (आताचा बांगलादेश) येथे पाकिस्तानी सैन्याचा पराभव केला, त्या 'विजय दिवस'च्या दिवशी हमाससारख्या संघटनेला पाठिंबा देणे योग्य नाही, असे एका एका वापरकर्त्याने म्हटले आहे. प्रियांका गांधी यांनी तत्काळ त्यांच्या सल्लागाराला काढून टाकले पाहिजे. आज भारतासाठी अत्यंत महत्वाचा विजय दिवस आहे. या दिवशी त्यांच्या आजीच्या नेतृत्वाखाली भारताने पाकिस्तानचा पराभव केला होता. प्रियांका गांधी यांनी भारताच्या विजयाचे प्रतिक म्हणून काहीतरी घेऊन जाणे जास्त योग्य ठरले असते असेही या वापरकर्त्याने पुढे म्हटले आहे.

### 'मोदी अदाणी भाई-भाई'

प्रियांका गांधी यांनी लोकसभेत बोलताना म्हणाल्या की, "मला पहिला मुद्दा हा मांडायचा आहे की या सरकारने बांगलादेशातील हिंदू आणि ख्रिश्चन अल्पसंख्याकांवर होणाऱ्या अत्याचाराविरुद्ध आवाज उठवला पाहिजे, त्यांच्याशी चर्चा करून त्यांचा पाठिंबा द्यावा..." . यावर प्रियांकां गांधी यांनी लोकांना त्यांनी काय परिधान करावे आणि काय करू नये हे सांगणे पितृसत्तेचे उदाहरण असल्याचे म्हटले. तसेच माझा पितृसत्ताक पद्धतीवर विश्वास नाही त्यामुळे मी मला हवं ते मी परिधान करेन असंही प्रियांका गांधी म्हणाल्या.प्रियांका गांधी यांनी एक्सेसरीजच्या माध्यमातून भाष्य करण्याची ही पहिलीच वेळ नाही. एक आठवड्यापूर्वी प्रियांका गांधी या पीएम मोदी आणि उद्योगपती गौतम अदाणी यांच्या फोटो आणि 'मोदी अदाणी भाई-भाई' असा मजकूर लिहिलेली बॅग घेऊन आल्या होत्या.

# शहडोलमध्ये पारा 1°; अयोध्येत 2.5°!

## भोपाळ, जबलपूरसह 37 जिल्ह्यांमध्ये थंडीच्या लाटेचा इशारा

**। नवी दिल्ली ।**
**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**डोंगराळ भागात झालेल्या बर्फवृष्टीमुळे देशाच्या उत्तरेकडील राज्यांमध्ये हिवाळा तीव्र होत आहे. मध्य प्रदेशात सात दिवसांपासून थंडीची लाट सुरू आहे. भोपाळ आणि जबलपूरसह 37 जिल्ह्यांमध्ये थंडीच्या लाटेचा इशारा देण्यात आला आहे. शहडोल येथील तापमान 1.0 अंशांवर पोहोचले आहे.**

उत्तर प्रदेशातील अयोध्येत पारा 2.5 अंशांवर पोहोचला आहे. 13 वर्षांनंतर कानपूरमध्ये किमान तापमान 4.5 अंश नोंदवले गेले. 2011 मध्ये 15 डिसेंबर रोजी येथे किमान तापमान 4.7 अंश नोंदवले गेले होते. राजस्थानमध्ये पुढील चार दिवस कडाक्याची थंडी पडण्याची शक्यता आहे. हंगामात प्रथमच थंडीच्या लाटेचा ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. फतेहपूर (सीकर) येथे उणे तापमानाची नोंद झाली. माउंट अबूमध्ये पानांवर बर्फ गोठला आहे. हवामान खात्याने सोमवारी बिहार-हरियाणासह 14 राज्यांत थंडीच्या लाटेचा इशारा जारी केला आहे. पंजाब आणि मध्य प्रदेशात थंडीच्या लाटेचा इशारा देण्यात आला आहे. ताज्या हिमवृष्टीनंतर उत्तराखंडमधील पिथौरागढ जिल्ह्यातील 18 हजार फूट उंच 'ओम' पर्वत बर्फाने झाकला गेला आहे. जगातील या एकमेव पौराणिक पर्वतावर नैसर्गिकरीत्या उदयास आलेले 'ओम' पुन्हा दिसू लागले आहे. गेल्या वर्षी अत्यंत कमी बर्फवृष्टी आणि डोंगरावरील वाढत्या तापमानामुळे या वर्षी ऑगस्टमध्ये पहिल्यांदाच या पर्वतावरून बर्फ गायब झाला होता. मात्र, आता आदि कैलास, बद्रीनाथ, केदारनाथ आणि गंगोत्री धामसह उंच भागात एक फुटापर्यंत बर्फवृष्टी झाली आहे. राज्य हवामान केंद्राचे संचालक डॉ. बिक्रम सिंह यांनी दिलेल्या माहितीनुसार, आठवडाभरानंतर बर्फवृष्टीची दुसरी जोरदार फेरी अपेक्षित आहे. कडाक्याच्या थंडीमुळे संपूर्ण मध्य प्रदेश हादरला आहे. सलग सातव्या दिवशी राज्यात थंडीची लाट कायम राहिली. पुढील 48 तास म्हणजे आणखी 2 दिवस अशीच थंडी कायम राहील. भोपाळ आणि जबलपूरसह 37 जिल्ह्यांमध्ये थंडीची लाट येण्याचा इशारा देण्यात आला आहे. यापैकी 9 जिल्हे असे आहेत की जेथे झाडे आणि वनस्पतींच्या पानांवर बर्फ साचू शकतो.



### सात दिवसांपासून थंडीची लाट सुरु

राजस्थानमध्ये थंडीचा प्रभाव तीव्र राजस्थानमध्ये थंडीचा प्रभाव तीव्र होणार आहे. पुढील चार दिवस राज्यातील शहरांमध्ये कडाक्याची थंडी राहणार आहे. या मोसमात पहिल्यांदाच हवामान खात्याने थंडीच्या लाटेचा ऑरेंज अलर्ट जारी केला आहे. या काळात शेखावतीच्या फतेहपूर (सीकर) व्यतिरिक्त इतर शहरांमध्येही पारा शून्य किंवा उणेपर्यंत घसरू शकतो.डोंगराळ भागात झालेल्या बर्फवृष्टीमुळे देशाच्या उत्तरेकडील राज्यांमध्ये हिवाळा तीव्र होत आहे. मध्य प्रदेशात सात दिवसांपासून थंडीची लाट सुरू आहे.

# महेश बाबूच्या मराठमोळ्या पत्नीने घेतली सुधा मूर्तींची भेट

अनंत अंबानी व राधिका मर्चंट यांच्या लग्नाला अनेक सेलिब्रिटींनी हजेरी लावली होती. या लग्नासाठी राजकीय, सामाजिक, मनोरंजन, क्रीडा या क्षेत्रातील मंडळी एकाच ठिकाणी जमली होती. याठिकाणी अनेक कलाकारांनी एकमेकांच्या भेटी घेतल्या. मराठमोळी अभिनेत्री व तेलुगू सुपरस्टार महेश बाबूची पत्नी नम्रता शिरोडकर हिने सुधा मूर्ती यांची भेट घेतली. तिने फोटो शेअर करत तिचा भेटीचा अनुभव सांगितला.नम्रता शिरोडकरने नुकतीच मुंबईत अनंत अंबानी आणि राधिका मर्चंटच्या लग्नाला हजेरी लावली होती. रेखा, नयनतारा, ऐश्वर्या राय आणि ज्योतिका यांच्याबरोबरचे अनेक फोटो ती तिच्या इन्स्टाग्रामवर शेअर करत आहे. आता नम्रताने लेखिका व राज्यसभा खासदार सुधा मूर्ती यांच्याबरोबरचा फोटो शेअर केला आहे. फोटो नम्रताने सुंदर ऑफ व्हाईट ड्रेस घातल्याचं पाहायला मिळत आहे, तर सुधा मूर्ती यांनी जांभळ्या रंगाची जरी वर्क असलेली साडी नेसली आहे. नम्रता शिरोडकरने सुंदर



फोटो शेअर करत त्याच्या कॅप्शनमध्ये लिहिलं, "मी हा क्षण कधीच विसरणार नाही... या बुद्धिमान महिलेबद्दल खूप काही ऐकलं होतं आणि त्यांना भेटल्यावर जे ऐकलं होतं त्यावर माझा विश्वास बसला आहे. कमालीच्या उत्साही आहेत. इतरांना त्या भरभरून प्रेम देतात! त्यांनी माझ्या आजीचं कौतुक केलं. इतकंच नाही तर माझे पती आणि माझ्या लेकीचंही कौतुक केलं, या आठवणी आयुष्यभर जपण्यासारख्या आहेत."नम्रताच्या या पोस्टवर नेटकरी कमेंट्स करून या फोटोचं कौतुक करत आहेत. अनेकांनी सुधा मूर्ती यांचंही कौतुक केलं आहे. चाहते यावर हार्ट इमोजी शेअर करत आहेत. नम्रताच्या बहिणीने माझं स्वप्न पूर्ण झालं अशी कमेंट या पोस्टवर केली आहे. दरम्यान, अनंत व राधिकाच्या लग्नाचे सलग तीन दिवस कार्यक्रम होते व या कार्यक्रमात पाहुण्यांची मांदियाळी होती. फक्त हिंदी सेलिब्रिटीच नाही तर दाक्षिणात्य, मराठी व भोजपुरी कलाकारांनाही रिसेप्शनसाठी निमंत्रित करण्यात आलं होतं. आशीर्वाद सोहळ्याला तर पंतप्रधान नरेंद्र मोदींनी हजेरी लावली होती. त्यांनी राधिका व अनंतला आशीर्वाद दिले होते. याशिवाय महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, राज्यपाल, उपमुख्यमंत्री अजित पवार, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हेही कुटुंबाबरोबर उपस्थित होते. शरद पवारही या कार्यक्रमाला हजर राहिले.

## दारूच्या बाटलीवरुन नोकराला मारहाण

पाकिस्तानी गायक राहत फतेह अली खान यांचा एक व्हिडिओ समोर आला आहे, ज्यामुळे सगळेच हैराण झाले आहेत. चाहत्यांनाही हा व्हिडीओ पाहून मोठा धक्का बसला आहे. समोर आलेल्या व्हिडिओमध्ये राहत फतेह अली खान आपल्याच नोकराला मारहाण करताना दिसत आहेत. ही मारहाण करताना टेबलावर ठेवलेली दारूची बाटली गेली कुठे, अशी विचारणाही ते करताना दिसत आहेत. हा व्हिडिओ पाहिल्यानंतर लोकांनी राहत फतेह अली खान यांच्यावर बरीच टीका केली आहे. नेटकऱ्यांनी सोशल मीडियावर राहत यांना चांगलेच खडेबोल सूनवायला सुरुवात केली. हे पाहताच राहत यांनी एक व्हिडिओ शेअर करत घडलेल्या प्रकाराबद्दल माफी मागितली आहे. व्हिडीओमध्ये राहत आपल्या घरातील काम करणाऱ्या नोकराला चपलेने मारताना अन् खेचतान दिसत आहेत.

## यामीच्या घरी गुडन्यूज?

बॉलिवूड अभिनेत्री यामी गौतमसध्या तिच्या आर्टिकल 370 या सिनेमामुळे चर्चेत आहे. काही दिवसांपूर्वीच आर्टिकल 370 या सिनेमातील तिचा फर्स्ट लूक पोस्टर प्रेक्षकांच्या भेटीला आला होता. याशिवाय टिझर आणि सिनेमाच्या रिलीज डेटबाबतही घोषणा करण्यात आली आहे. सिनेमाची घोषणा करण्यात आल्यानंतर अभिनेत्री यामी गौतमने पती आणि आई समवेत दिसली होती. दरम्यान आता यामीचा लूक पाहिल्यानंतर ती प्रेग्नंट असल्याच्या बातम्या व्हायरल होत आहेत. मात्र, या प्रेग्नंसीबाबत्या बातम्यांना यामीकडून कोणतेही प्रत्युत्तर देण्यात आलेले नाही. यामी गौतम आणि आदित्य धर मुंबईत एकत्रित स्पॉट झाली. यावेळी यामीने गुलाबी कलरचा सूट घातलेला दिसतोय. तर दिग्दर्शक आदित्य धर पांढऱ्या रंगाच्या कुर्त्यामध्ये यामीसोबत दिसत आहेत. दोघे एकत्रित दिसले आणि यामीच्या वेगळ्याच लूकने चाहत्यांचे लक्ष वेधलं आहे. यामी गौतम प्रेग्नंट असल्याच्या बातम्यांनी जोर धरलाय. दरम्यान यामीने गुलाबी सूटच्या ओढणीला वेगळ्या अंदाजात कॅरी करताना पाहिले. त्यामुळे सोशल मीडियावर चाहते यामी प्रेग्नंट असल्याची शक्यता वर्तवताना दिसत आहेत.



## प्रियांका चोप्राच्या पतीचं भारतात जोरदार स्वागत!

बॉलीवूडची देसी गर्ल प्रियंकाचा पती निक जोनास हा अमेरिकेतील प्रसिद्ध गायक आहे. निकचे मोठे भाऊ केविन आणि जो यांच्यासह 'जोनास ब्रदर्स' नावाचा त्यांचा बँड आहे, जो जगभरात प्रसिद्ध आहे. निक जोनास व त्याचे भाऊ केविन जोनास आणि जो जोनास हे भारतात आले आहेत. मुंबईच्या महालक्ष्मी रेसकोर्सवर शनिवारी त्यांचा भव्य संगीत कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. हा त्यांचा भारतातील पहिला संगीत कार्यक्रम होता. भारतात निक आणि जोनास ब्रदर्सचे प्रचंड चाहते आहेत. निक गाण्यासाठी स्टेजवर येताच जमलेल्या प्रेक्षकांनी 'जीजू' असे संबोधित निकचे स्वागत केले. किंग आणि निकच्या "तू मान मेरी जान" या कोलॅबरेटेड गाण्यावर प्रेक्षक मंत्रमुग्ध होताना दिसले.जोनास ब्रदर्सचा भारतात पहिलाच कार्यक्रम असल्याने चाहते अतिउत्साही दिसत होते. शनिवारच्या या कार्यक्रमाचे व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल होताना दिसत आहेत. यात जोनास ब्रदर्स त्यांच्या कार्यक्रमाचा पुरेपूर आनंद घेताना दिसले.यातला मजेशीर भाग म्हणजे, जो आणि केविनने चाहत्यांना निकची ओळख 'जीजू' म्हणून करून दिली, त्यामुळे तिथे जमलेल्या प्रेक्षकांनी निकचा 'जीजू' 'जीजू' असा जयघोष करत स्वागत केले. २०२३ ला रीलिज झालेल्या "'तू मान मेरी जान' X 'आफ्टरलाईफ'" या गाण्यावर निक आणि किंगने एकत्र संगीत सादर केलं. कॉन्सर्टदरम्यान निक मजेशीररित्या प्रेक्षकांना म्हणाला, "भारतात परफॉर्म करण्याची आमची ही पहिलीच वेळ आहे. यात २०१८ मध्ये झालेल्या प्री वेडिंगमधला संगीत सोहळा ग्राह्य धरला जात नाही."भारतासाठी असलेल्या आपल्या भावना व्यक्त करत निक प्रेक्षकांना म्हणाला.



## मला बॉलीवूड पार्ट्यांमध्ये बोलवत नाहीत

अभिनेता मनोज बाजपेयी हे तीन दशकांहून अधिक काळ इंडस्ट्रीमध्ये कार्यरत आहेत. त्यांनी संघर्ष, नकार आणि अनेक वर्षांच्या मेहनतीनंतर सिनेसृष्टीत स्वतःचे स्थान निर्माण केले आहे. त्यांनी १०० हून अधिक चित्रपटांमध्ये काम केले आहे. स्क्रीनच्या 'डियर मी' या नवीन एपिसोडमध्ये मनोज बाजपेयी यांनी त्यांच्या सिनेसृष्टीतील प्रवासाबद्दल सांगितले आणि लोक त्यांना कसे उद्धट समजतात, याबद्दलही ते बोलले. मनोज बाजपेयी यांना त्यांनी स्वतःला वादांपासून कसे दूर ठेवले हा प्रश्न विचारण्यात आला. यासह त्यांनी स्वतःला पार्टी आणि किंवा रेड कार्पेट कार्यक्रमांपासूनही कसे अलिप्त ठेवले हाही प्रश्न विचारण्यात आला. मनोज बाजपेयी म्हणाले, "माझं मोठं वादात अडकण्याचं असं काही विशेष कारण नाही, पण हे खरं आहे की मी कधीही पार्ट्यांना जात नाही. आता लोक मला आमंत्रणही देत नाहीत, कारण त्यांना समजलं आहे की मी उपस्थित राहत नाही, त्यामुळे त्यांना वाटतं का उगाच अपमान करून घ्यावा? हा विचार करून ते मला आमंत्रण देत नाही. कृपया मला पार्ट्यांना बोलावू नका, कारण मला रात्री १०-१०.३० पर्यंत झोपायला जायचं असतं आणि आणि मला सकाळी लवकर उठायला आवडतं."त्यांनी पुढे सांगितलं, "हो, मी कधी कधी काही लोकांना भेटतो. माझे काही मित्र आहेत. शारीब हाशमी त्यापैकीच एक आहे. पण माझे फारसे अभिनेता मित्र नाहीत. मला के के मेनन यांचा खूप आदर आहे, तसेच नवाजुद्दीन सिद्दीकी यांचा सुद्धा आदर करतो. पण आम्ही एकमेकांना फारसा वेळ देऊ शकत नाही, कारण आम्ही सगळेच खूप व्यस्त असतो." मनोज बाजपेयी यांनी त्यांच्या स्वाभिमानाला उद्धटपणाचे लेबल लावले जाते, याबद्दल बोलताना सांगितले.

# केन विल्यमसनने घडवला इतिहास

## सर्वोत्कृष्ट कामगिरी करणारा जगातील पहिलाच फलंदाज

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**न्यूझीलंड वि इंग्लंड तिसऱ्या कसोटीत केन विल्यमसनने इतिहास घडवला आहे. विल्यमसनने कसोटीत ३३वे शतक झळकावले आहे. विल्यमसनचे शतक आणि इतर फलंदाजांच्या महत्वपूर्ण धावसंख्येच्या जोरावर दुसऱ्या डावात ४५३ धावा केल्या. यासह न्यूझीलंडने ६५८ धावांची अभेद्य आघाडी मिळवली आहे.**




तिसऱ्या कसोटी सामन्यात केन विल्यमसनने २०४ चेंडूत २० चौकार आणि एका षटकारासह १५६ धावांची महत्त्वपूर्ण खेळी केली. या सामन्यात शतक पूर्ण करून, विल्यमसन कसोटी क्रिकेटच्या १४७ वर्षांच्या इतिहासात एकाच मैदानावर सलग पाच सामन्यांमध्ये शतक करणारा पहिला क्रिकेटपटू ठरला. हॅमिल्टन येथील सेडॉन पार्कमध्ये त्याने ही कामगिरी केली. हा किवी फलंदाज तिसऱ्या कसोटीच्या दुसऱ्या डावात १५६ धावांवर बाद झाला.केन विल्यमसनने हॅमिल्टमनमधील मैदानावर कायमच उत्कृष्ट कामगिरी केली आहे. या सामन्यापूर्वी विल्यमसनने या मैदानावर २०१९ मध्ये बांगलादेशविरुद्ध २०० धावा, २०१९ मध्ये इंग्लंडविरुद्ध १०४ धावा, २०२० मध्ये वेस्ट इंडिजविरुद्ध २५१ धावा आणि यावर्षी दक्षिण आफ्रिकेविरुद्ध १३३* धावा केल्या होत्या. विल्यमसन विशिष्ट मैदानावर १०० पेक्षा जास्त सरासरी असलेल्या खेळाडूंच्या क्लबमध्ये सामील होण्याच्या मार्गावर आहे. आतापर्यंत कोणत्याही एका मैदानावर १०० पेक्षा जास्त सरासरीने धावा करणाऱ्या फलंदाजांमध्ये ऑस्ट्रेलियाचे डॉन ब्रॅडमन अव्वल स्थानी आहेत, ज्यांनी मेलबर्न क्रिकेट ग्राउंडवर १२८.५३ च्या जोरदार सरासरीने धावा केल्या आहेत. भारताचे व्हीव्हीएस लक्ष्मण या यादीत दुसऱ्या स्थानावर आहेत, ज्याने कोलकाता येथील ईडन गार्डन मैदानावर ११०.६३ च्या सरासरीने धावा करण्याचा विक्रम केला आहे. बार्बाडोसमधील किंग्स्टन ओव्हलवर १०४.१५ च्या सरासरीने धावा करणाऱ्या कोणत्याही एका मैदानावर १०० पेक्षा जास्त सरासरीने धावा करणाऱ्या फलंदाजांमध्ये गारफिल्ड सोबर्सचे नाव देखील समाविष्ट आहे.या बाबतीत त्याने मायकेल क्लार्क (ॲडलेड), जो रूट (लॉर्ड्स) आणि महेला जयवर्धने (गॉल) या महान खेळाडूंची बरोबरी केली आहे. शतकं जयवर्धने (११, कोलंबो एसएससी), ब्रॅडमन (९, मेलबर्न), जॅक कॅलिस (९, केपटाऊन) आणि कुमार संगकारा (८, कोलंबो एसएससी) यांनी एकाच मैदानावर अधिक शतकं झळकावली आहेत. तिसऱ्या कसोटी सामन्यात केन विल्यमसनने २०४ चेंडूत २० चौकार आणि एका षटकारासह १५६ धावांची महत्त्वपूर्ण खेळी केली. या सामन्यात शतक पूर्ण करून, विल्यमसन कसोटी क्रिकेटच्या १४७ वर्षांच्या इतिहासात एकाच मैदानावर सलग पाच सामन्यांमध्ये शतक करणारा पहिला क्रिकेटपटू ठरला. हॅमिल्टन येथील सेडॉन पार्कमध्ये त्याने ही कामगिरी केली. हा किवी फलंदाज तिसऱ्या कसोटीच्या दुसऱ्या डावात १५६ धावांवर बाद झाला.केन विल्यमसनने हॅमिल्टमनमधील मैदानावर कायमच उत्कृष्ट कामगिरी केली आहे. या सामन्यापूर्वी विल्यमसनने या मैदानावर २०१९ मध्ये बांगलादेशविरुद्ध २०० धावा, २०१९ मध्ये इंग्लंडविरुद्ध १०४ धावा, २०२० मध्ये वेस्ट इंडिजविरुद्ध २५१ धावा आणि यावर्षी दक्षिण आफ्रिकेविरुद्ध १३३* धावा केल्या होत्या. विल्यमसन विशिष्ट मैदानावर १०० पेक्षा जास्त सरासरी असलेल्या खेळाडूंच्या क्लबमध्ये सामील होण्याच्या मार्गावर आहे. आतापर्यंत कोणत्याही एका मैदानावर १०० पेक्षा जास्त सरासरीने धावा करणाऱ्या फलंदाजांमध्ये ऑस्ट्रेलियाचे डॉन ब्रॅडमन अव्वल स्थानी आहेत, ज्यांनी मेलबर्न क्रिकेट ग्राउंडवर १२८.५३ च्या जोरदार सरासरीने धावा केल्या आहेत.

### न्यूझीलंडने 658 धावांची आघाडी मिळवली

भारताचे व्हीव्हीएस लक्ष्मण या यादीत दुसऱ्या स्थानावर आहेत, ज्याने कोलकाता येथील ईडन गार्डन मैदानावर ११०.६३ च्या सरासरीने धावा करण्याचा विक्रम केला आहे. बार्बाडोसमधील किंग्स्टन ओव्हलवर १०४.१५ च्या सरासरीने धावा करणाऱ्या कोणत्याही एका मैदानावर १०० पेक्षा जास्त सरासरीने धावा करणाऱ्या फलंदाजांमध्ये गारफिल्ड सोबर्सचे नाव देखील समाविष्ट आहे.या शतकाच्या जोरावर विल्यमसन आता एकाच मैदानावर सर्वाधिक शतकं झळकावणाऱ्या फलंदाजांच्या यादीत सामील झाला आहे. या बाबतीत त्याने मायकेल क्लार्क (ॲडलेड), जो रूट (लॉर्ड्स) आणि महेला जयवर्धने (गॉल) या महान खेळाडूंची बरोबरी केली आहे.न्यूझीलंड वि इंग्लंड तिसऱ्या कसोटीत केन विल्यमसनने इतिहास घडवला आहे. विल्यमसनने कसोटीत ३३वे शतक झळकावले आहे. विल्यमसनचे शतक आणि इतर फलंदाजांच्या महत्त्वपूर्ण धावसंख्येच्या जोरावर दुसऱ्या डावात ४५३ धावा केल्या. यासह न्यूझीलंडने ६५८ धावांची अभेद्य आघाडी मिळवली आहे.

# रजत पाटीदार पंचांच्या निर्णयावर वैतागला

## मैदान सोडण्यास दिला नकार; माफी मागत पंचांनी बदलला निर्णय

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**मुंबईने १५ डिसेंबरला झालेल्या अंतिम सामन्यात मध्य प्रदेशचा पाच गडी राखून पराभव करत सय्यद मुश्ताक अली करंडक जिंकला. मुंबईच्या संघाने सुरुवातीच्या धक्क्यांतून सावरत १७५ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना १७.५ षटकांत पाच गडी गमावून १८० धावा करत विजय मिळवला.**




थोड्या कठीण खेळपट्टीवर कर्णधार रजत पाटीदारच्या नाबाद ८१ धावांच्या खेळीमुळे मध्य प्रदेशने २० षटकांत आठ गडी गमावून १७४ धावा केल्या. अंतिम सामन्यात मध्य प्रदेशच्या डावात कर्णधार रजत पाटीदार तिसऱ्या पंचाच्या निर्णयावर नाराज दिसला आणि त्याने क्रीज सोडण्यास नकार दिला.मध्य प्रदेशच्या डावातील शेवटच्या चेंडूवर रजत पाटीदारला शार्दुल ठाकूरने ऑफ स्टंपच्या बाहेर फुल चेंडू टाकला. रजत ऑफ स्टंपच्या बाहेर गेला होता पण असे असूनही अंपायरने त्याला वाइड दिले. मुंबईने या निर्णयाच्या विरोधात तिसऱ्या पंचांकडे अपील केली, जिथे पंचांनी तो कायदेशीर चेंडू असल्याचे घोषित केले.मात्र, मध्य प्रदेशचा कर्णधार पंचांच्या निर्णयावर खूश नव्हता आणि त्याने मैदानावरील पंचांना चेंडू कुठे पिच झाला आहे हे पाहण्यास सांगितले. यानंतर मध्य प्रदेशच्या कर्णधाराने स्क्वेअर लेग अंपायरशी चर्चा केली आणि थर्ड अंपायरला पुन्हा तपासून निर्णय घेण्यास भाग पाडले. चेंडू मार्करच्या बाहेर पिच झालेला असल्याने, रजत पाटीदारने ऑफ स्टंपच्या बाहेर जाऊन चेंडू खेळल्यानंतरही तो वाईड चेंडू देणे अपेक्षित होतं.

### मुंबईने सामना आपल्या नावे केला

तिसरे पंच अनंतपद्मनाभन यांनी पुन्हा तपासल्यानंतर ऑन एअर म्हणाले, माफ करा चेंडू पॉपिंग क्रीझच्या बाहेर पिच झाला होता, मला ते दिसलं नाही. तिसऱ्या पंचांनी निर्णय बदलल्यानंतर मध्य प्रदेशला आणखी एक चेंडू मिळाला. यावर मध्य प्रदेशचा कर्णधार रजत पाटीदारने षटकार ठोकला. त्याने ४० चेंडूत ६ षटकारांच्या मदतीने ८१ धावा केल्या. पण रजत पाटीदारची ही निर्णायक खेळी संघाच्या विजयात महत्त्वपूर्ण भूमिका बजावू शकली नाही आणि मुंबईच्या संघाने सामना आपल्या नावे केला.

|| वर्ष - 8 | अंक -158 || UDYAM-MH-26-0158827 ||

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | मंगळवार, दिनांक 17 डिसेंबर 2024 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## 46 वर्षांनंतर माधुरी मिसाळ यांच्या रूपाने महिला मंत्री

# पुणे जिल्ह्याला चार मंत्रिपदे!

### पिंपरी-चिंचवडचे प्रतिनिधित्व करणाऱ्या एकालाही मंत्रिमंडळात स्थान नाही

| पुणे | महाईन्यूज

**विधानसभा निवडणुकीनंतर देवेंद्र फडणवीस सरकारच्या पहिल्या मंत्रिमंडळ विस्तारात पुणे जिल्ह्याला चार मंत्रिपदे देण्यात आली आहेत. पुण्याला ४६ वर्षांनंतर माधुरी मिसाळ यांच्या रूपाने महिला मंत्री मिळाली आहे. ज्येष्ठ नेते शरद पवारांचा सत्तेतील प्रभाव ओसरू लागल्यानंतर पहिल्यांदाच पुणे शहरातील लोकप्रतिनिधींचा राज्याच्या राजकारणातील दबदबा वाढू लागल्याचे प्रतिबिंब यंदाच्या मंत्रिमंडळात उमटले आहे. औद्योगिक नगरी असलेल्या पिंपरी-चिंचवडचे प्रतिनिधित्व करणाऱ्या तिघांपैकी एकालाही मंत्रिमंडळात स्थान मिळालेले नाही.**



विधानसभा निवडणुकीत पुणे जिल्ह्यात २१ पैकी १८ विधानसभा मतदारसंघात महायुतीने महाविकास आघाडीला धूळ चारली. शहरातही आठपैकी सात विधानसभा मतदारसंघांत महायुतीने निर्विवाद विजय मिळविला. निकालानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या बरोबरीने उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीही शपथ घेतली. त्यानंतर 'फडणवीस ३.०' सरकारच्या पहिल्या मंत्रिमंडळ विस्तारात पुणे शहरातून कोथरूडचे आमदार चंद्रकांत पाटील यांनी कॅबिनेट, पर्वतीच्या आमदार माधुरी मिसाळ यांनी राज्यमंत्रिपदाची शपथ घेतली, तर जिल्ह्यातून इंदापूरचे आमदार दत्तात्रय भरणे यांना मंत्रिमंडळात स्थान देण्यात आले.

पुण्याचे खासदार मुरलीधर मोहोळ केंद्रीय विमान वाहतूक व सहकार राज्यमंत्री आहेत, तर आमदार चंद्रकांत पाटील हे कॅबिनेट आणि आमदार माधुरी मिसाळ या राज्यमंत्री आहेत. यापूर्वी, १९९५ मध्ये युती सरकारच्या कार्यकाळात शिवसेनेचे शशिकांत सुतार आणि भाजपचे दिलीप कांबळे यांच्या रूपाने शहराकडे दोन मंत्रिपदे होती. २००४ मध्ये कँटोन्मेंटचे आमदार बाळासाहेब शिवरकर यांनी सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्रिपद व बोपोडीचे आमदार चंद्रकांत छाजेड यांनी पर्यटन राज्यमंत्रिपद भूषवले, तर २००९ मध्ये काँग्रेसचे आमदार रमेश बागवे यांनी गृहराज्यमंत्रिपद भूषविले.

सन २०१४ मध्ये कसब्याचे आमदार गिरीश बापट यांनी अन्न व नागरी पुरवठा मंत्री म्हणून मंत्रिमंडळात काम केले, तर दिलीप कांबळे हे सामाजिक न्याय राज्यमंत्री होते. सन २०१९ नंतर उद्धव ठाकरे यांच्या महाविकास आघाडी सरकारमध्ये पुण्याला मंत्रिपद मिळाले नव्हते. त्याची भरपाई 'फडणवीस ३.०' सरकारमध्ये झाली आहे.

सन १९९९ ते २००४ या पंचवार्षिकमध्ये खेडचे आमदार रामकृष्ण मोरे यांनी काही काळ शालेय शिक्षणमंत्री पद भूषविले होते. त्यांच्यानंतर पुण्याची 'सिस्टर सिटी' असलेल्या पिंपरी-चिंचवडच्या एकाही आमदाराची मंत्रिपदावर वर्णी लागलेली नाही. पुणे जिल्ह्याला प्रथमच मोठ्या प्रमाणावर प्रतिनिधित्व मिळाले असून, पुणे जिल्हा हा केंद्रासह राज्याच्या राजकारणात 'हेविवेट' जिल्हा ठरला आहे. महायुतीने मंत्रिमंडळात पुणे शहर व जिल्ह्याला झुकते माप देऊन आगामी महापालिका निवडणुकीची तयारी सुरु केल्याची चर्चा आहे.

## जिल्ह्याला प्रथमच पाच मंत्री

केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ, उपमुख्यमंत्री अजित पवार, कॅबिनेटमंत्री चंद्रकांत पाटील व दत्तात्रेय भरणे आणि राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांच्या रूपाने पुणे जिल्ह्याला प्रथमच पाच मंत्रिपदे मिळाली असून, पुणे जिल्हा हा केंद्रासह राज्याच्या राजकारणात 'हेवीवेट' जिल्हा ठरला आहे. महायुतीने मंत्रिमंडळात पुणे शहर व जिल्ह्याला झुकते माप देऊन आगामी महापालिका निवडणुकीची तयारी सुरू केल्याची चर्चा आहे.

## चंद्रकांत पाटील, दत्तात्रय भरणेंनी कॅबिनेट, तर माधुरी मिसाळ यांनी घेतली राज्यमंत्रिपदाची शपथ

महायुती सरकारच्या रविवारी झालेल्या पहिल्याच मंत्रिमंडळ विस्तारात भाजपकडून कोथरूडचे आमदार चंद्रकांत पाटील यांना कॅबिनेट तर पर्वतीच्या आमदार माधुरी मिसाळ यांना राज्यमंत्रिपदी संधी देण्यात आली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे इंदापूरचे आमदार दत्तात्रय भरणे यांनीही कॅबिनेट मंत्री म्हणून शपथ घेतली.

दरम्यान, अजित पवार यांनी नुकतीच उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली होती. त्यामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकारमध्ये जिल्ह्यातून एकूण चार मंत्र्यांचा समावेश झाला आहे. त्यामुळे आगामी काळात शहर व जिल्ह्याच्या विकासाला चांगली गती मिळू शकणार आहे. विधानसभा निवडणुकीत शहरातील आठपैकी सात जागा जिंकून महायुतीने नेत्रदीपक यश मिळविले होते. त्यामुळे या वेळी पुण्याला किमान दोन मंत्रीपदे मिळतील, अशी चर्चा होती. त्यानुसार कोथरूडचे आमदार चंद्रकांत पाटील यांना अपेक्षेनुसार कॅबिनेट मंत्रीपद मिळाले. पर्वती मतदारसंघातून सलग चौथ्यावेळी आमदार झालेल्या माधुरी मिसाळ यांना राज्यमंत्रिपदाची संधी दिली गेली आहे. चंद्रकांत पाटील यांनी यापूर्वीच्या मंत्रिमंडळात उच्च व तंत्रशिक्षण मंत्रीपद भूषविले होते. लोकसभा निवडणुकीत विजयी झालेले मुरलीधर मोहोळ यांना पहिल्याच टर्ममध्ये भाजपने केंद्रीय राज्यमंत्रिपदाची संधी दिली. त्यामुळे केंद्रात एक आणि राज्यात दोन अशी तीन मंत्रीपदे पुण्याच्या वाट्याला आली आहेत.

## इंदापुरात जल्लोष

इंदापूर तालुक्याचे तिसऱ्यांदा प्रतिनिधित्व करणारे आमदार दत्तात्रय भरणे यांनी कॅबिनेट मंत्री म्हणून शपथ घेताच इंदापूरकरांनी जल्लोष करत फटाक्यांची आतषबाजी केली. सन 2019 मध्ये भरणे यांनी सार्वजनिक बांधकाम, वन, दुग्ध, पशुसंवर्धन तसेच मत्स्य या खात्यांसह राज्यमंत्रीपद भूषविले होते. तसेच, ते सोलापूर जिल्ह्याचे